शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं ५२/२०१८

| | | |
|---|---|---|
| १. श्री.बबन शंकर सातपुते | } | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | | |
| १. प्राचार्य, मिरज महाविद्यालय, मिरज, जि.सांगली.<br>२. अध्यक्ष, यशवंत शिक्षण संस्था, सांगली, जि.सांगली. | } | वि. प |

**तक्रारीचे स्वरूप :**

यशवंत शिक्षण संस्था, सांगली, या संस्थेचे मिरज महाविद्यालय, मिरज, जि. सांगली यांचेकडील सहा. प्राध्यापक श्री. बबन शंकर सातपुते विषय हिंदी यांनी दिनांक ०७/१२/२०१७ रोजी तक्रार निवारण समितीकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जात नमुद तक्रार पुढील प्रमाणे.

मी यशवंत शिक्षण संस्था, सांगली (कुपवाड) द्वारा संचलित मिरज महाविद्यालय, मिरज, येथे दि. १ ऑगस्ट, १९९६ पासून हिंदी विषयाचा सहा. प्राध्यापक म्हणून काम करीत आहे. मी शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. ही पदवी हिंदी विषयामध्ये दि. १८/०४/२०१३ रोजी धारण केली आहे. सहाव्या वेतन आयोगानुसार सेवेत असताना पीएच. डी. पदवी धारण केल्यास अशा शिक्षकांना तीन वेतनवाढी देय आहेत. या बाबतीत मा. प्राचार्यांकडे वारंवार लेखी व तोंडी तक्रार करून देखील मा. प्राचार्य/अध्यक्ष/सेक्रेटरी यांनी मला न्याय दिलेला नाही. सबब नियमाप्रमाणे देय असणाऱ्या पीएच.डी. वेतनवाढी देणेबाबत आदेश व्हावेत. तसेच सदरचे आदेश पीएच.डी. पदवी धारण केलेल्या दिनांकापासुन व्हावेत व मला न्याय दयावा.

**संस्थेचा अभिप्राय :**

संबंधित शिक्षकांने जोडलेली आहेत.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

डॉ. बबन शंकर सातपुते यांनी केलेल्या गैरवर्तनाबाबत चौकशी सुरू आहे. तसेच त्यांनी संस्था व महाविद्यालय यांचे विरूद्ध केलेल्या आंदोलनामुळे त्यांना दिलेल्या शिक्षेबाबत मा. उच्च न्यायालयात दावा प्रलंबित आहे. त्यामुळे त्यांना सदर वेतनवाढी देण्यात आलेल्या नाहीत.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदाराने महाविद्यालयाच्या प्राचार्य यांना लिहीलेले दिनांक २८/०८/२०१७ चे पत्र जोडले आहे व सोबत मिरज महाविद्यालय, मिरज यांचे विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांना लिहीलेले दि.२४/०८/१७ चे पत्र ज्याद्वारे तक्रारदारास तीन वेतनवाढी पीएच. डी. करीता मंजूर करण्याचा प्रस्ताव सादर केलेला आहे. तथापी चौकशीच्या वेळी असे निर्दशनास आले की, संबधित प्रस्तावाबरोबर महाविद्यालयाने तक्रारदाराचे सेवा पुस्तक विभागीय सहसंचालकांकडे अग्रेषित केलेले नाही त्यामुळे सदर प्रस्तावावर आजपर्यंत निर्णय झालेला नाही.

तथापी संस्थेचे असे म्हणणे आहे की, तक्रारदाराविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही चालू आहे त्यामुळे तक्रारदारास तिन वेतनवाढी देण्यात आलेल्या नाहीत. तथापी तक्रारदारास पीएच.डी. प्राप्त केल्यामुळे मिळणाऱ्या वेतनवाढी व त्याचा खातेनिहाय चौकशीशी काहीही संबध नाही. संस्थेतर्फे देण्यात आलेले कारण योग्य व कायदेशीर नाही त्यामुळे संस्थेचे म्हणणे मान्य करता येणार नाही असे या समितीचे मत आहे. तसेच जर खातेनिहाय चौकशीमध्ये तक्रारदार दोषी आढळल्यास संस्था त्यावेळी योग्य ती कार्यवाही करू शकते यामुळे संस्थेचे म्हणणे या समितीस मान्य करता येणार नाही.

संस्थेने जाणूनबूजूण योग्य कागदपत्रांची तजवीज केलेली दिसत नाही व यामागील हेतू असा स्पष्ट होतो की, संस्थेस तक्रारदारास तिन वेतनवाढी मिळू नयेत म्हणून प्रस्ताव अर्धवटच ठेवायचा आहे जे की नियमानूसार अयोग्य व

बेकायदेशीर आहे. करीता या प्रकरणी ही समिती या निष्कर्षाप्रत आली आहे की, संस्थेस अपूऱ्या प्रस्तावातील अपूऱ्या कागदपत्राबाबत तजविज करण्याबाबत सूचना देणे योग्य व यथोचित होईल. करीता ही समिती खालील आदेश करीत आहे.

## आदेश

संस्था व महाविद्यालय यांनी तक्रारदार यांना पीएच.डी. बाबत देय असलेल्या तीन अग्रीम वेतनवाढी बाबत त्यांचे सेवापूस्तक व आवश्यक कागदपत्रे त्वरीत विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांचे कार्यालयात १५ दिवसाचे आंत हा आदेश प्राप्त झाल्यापासून दाखल करण्याचे आहे. या व्यतिरिक्तही प्रस्तावात अन्य काही त्रुटी असल्यास त्याचेही निराकरण संस्था व महाविद्यालय यांनी उपरोक्त कालमर्यादित करण्याचे आहे. झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन कळविणेत यावे.

दिनांक : 28 FEB 2020

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

अध्यक्ष
(श्री. एस.पी.कुलकर्णी)

सदस्य
( श्री. व्ही. डी. नांदवडेकर )

सदस्य
(श्री. पी.डी. राऊत)

सदस्य
( श्री.आर.बी.तुपे )

सदस्य
(श्री.एन.बी.गायकवाड)

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए. कदम)